www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले  उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड  कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर  निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील  सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २  अंक : 221 वा  शनिवार दि. 26 एप्रिल २०२५  किंमत : ४ रु  पृष्ठ : ४  RNI MAHMAR/2023/89514

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

## भारताची धास्ती घेत पाक लष्कराची सीमेवर मोठ्या प्रमाणात जमवाजमव; सैनिकांची संख्या वाढवली

जम्मू - भारत-पाक आंतरराष्ट्रीय सीमेवर पाकिस्तानने अधिक सैन्याची जमवाजमव करण्यास सुरुवात केली आहे. तेथील अनेक चौक्यांवर असलेल्या पाकिस्तानच्या असलेल्या सैनिकांपेक्षा तिप्पट-चौपट संख्येने त्या देशाचे सैनिक दिसू लागले आहेत.

पहलगाम येथे मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत व पाकिस्तानमध्ये मोठ्या प्रमाणावर तणाव निर्माण झाला आहे. भारत कारवाई करणार या भीतीने पाकिस्तानी लष्करानेही सीमेवरील हालचाली वाढविल्या



आहेत. जम्मूच्या सीमेवर पाकने १३ चिनाब रेंजर्स, तर सांबा, कठुआच्या सीमेवर अनुक्रमे १४ व २६ चिनाब रेंजर्सचे अतिरिक्त सैनिक पाकिस्तानने तैनात केले आहेत. पाकिस्तानी लष्कराने आंतरराष्ट्रीय सीमा व नियंत्रण रेषेवर रणगाडे, स्वयंचलित तोफखाना व अन्य शस्त्रास्त्रे मोठ्या प्रमाणावर आणण्यास प्रारंभ केला आहे. आम्ही कोणत्याही संघर्षासाठी सज्ज आहोत असा आव पाकिस्तानने आणला असला तरी भारताने याआधी केलेला सर्जिकल स्ट्राइक व एअर स्ट्राइक यांच्यामुळे पाक लष्कर धास्तावले आहे, अशी माहिती भारतीय लष्कराच्या सूत्रांनी दिली.

## भारताकडून पाकिस्तानला पाण्याचा थेंबही मिळणार नाही; केंद्र सरकारनं आखली रणनीती

नवी दिल्ली - भारताकडूनपाकिस्तानला पाण्याचा एकही थेंब मिळणार नाही. तशी रणनीती केंद्र सरकार तयार करत आहे, असे केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी शुक्रवारी ठामपणे सांगितले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली दिल्लीत झालेल्या उच्चस्तरीय बैठकीनंतर पाटील यांनी हे वक्तव्य केले. सी. आर. पाटील म्हणाले की, सिंधू जल करार भारताने स्थगित केला असून, या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात



आली होती. भारतातून पाकिस्तानला पाण्याचा एकही थेंब दिला जाणार नाही, यावर केंद्र सरकार ठाम आहे. १९६० साली भारत व पाकिस्तानने सिंधू जल करार केला होता. पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने हा करार स्थगित केला आहे. पाटील यांनी सांगितले की, सीमेपलीकडून सतत होणाऱ्या दहशतवादी कारवायांमुळे पाकिस्तानने दोन देशांतील कराराच्या अटींचा भंग केला आहे. त्यामुळे हा करार स्थगित करण्यात येत असल्याचे भारताने पाकिस्तानला कळविले आहे.

## पाकिस्तान आणि आतंकवादाच्या विरोधात रिपब्लिकन पक्षाने काढली बांद्रा येथे निषेध रॅली

### पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घेऊन पाकिस्तानी आतंकवादाचे समूळ उच्चाटन करावे : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक युवक आधार**
**पनवेल:(आनंद पवार)**
जम्मू काश्मीर च्या पहलगाम मध्ये निर्दोष भारतीय पर्यटकांवर अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २७ जणांना जीव गमवावा लागला.या निर्घुण अतिरेकी हल्ल्याच्या निषेधार्थ आणि या अतिरेकी कारवाया करणाऱ्या पाकिस्तानचा निषेध करण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षातर्फे शुक्रवारी भरदुपारी रखरखत्या उन्हात बांद्रा पूर्व कलानगर म्हाडा ऑफिस या भागात रॅली काढण्यात आली.


पाकिस्तान बरोबर आता आरपारची लढाई केली पाहिजे.पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घेऊन पाकिस्तानी आतंकवाद समूळ नष्ट केला पाहिजे.पाक ला एकदा युद्धाचा एकदा जोरदार शॉक दिलाच पाहिजे असे ना.रामदास आठवले यांनी सांगितले. बांद्रा पूर्व येथील आतंकवाद विरोधी निषेध रॅलीचे आयोजन रिपब्लिकन पक्षाच्या मुंबई प्रदेश तर्फे करण्यात आली होती अशी माहिती रिपाइंचे मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे यांनी दिली.रिपब्लिकन पक्षाच्या आतंकवाद विरोधी रॅली चे नेतृत्व रिपाइंचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर,राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे,मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे,मुंबई सरचिटणीस विवेक पवार,जिल्हा अध्यक्ष रमेश गायकवाड,संजय पवार, अजित रणदिवे,प्रकाश जाधव,संजय डोळसे,रवी गायकवाड, सचिनभाई मोहिते यांनी केले. महिला आघाडीच्या अड आशाताई लांडगे,अभया सोनवणे, उषाताई रामलू,तसेच रिपाइंचे श्रीकांत भालेराव,सोहेल शेख,योगेश शिलवंत, विजय वंजारी,सो. ना. कांबळे,रतन अस्वारे,अमित तांबे,चंद्रकांत पाटील, रशीद अन्सारी,भारती




गुरव,रत्ना शिंदे, आदी मंडळी निषेध रॅलीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## महसूल विभागाच्या पथकाकडून अवैध रेती वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर जप्त

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:**
**-जितेंद्र खोडे**
**राळेगाव:**-दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजी सकाळच्या सुमारास अंदाजे ५:३० वाजता मौजा राळेगाव शिवारामध्ये अवैध रेती वाहतूक करणाऱ्या दोन ट्रॅक्टरवर महसूल विभागाच्या पथकाने संयुक्त कारवाई करत त्यांना जप्त केले.




सदर कारवाई मंडळ अधिकारी श्री. गाईड चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. त्यांच्यासोबत ग्राम महसूल अधिकारी अनिल ओंकार (नागठाणा), सौरभ तुमस्कर (राळेगाव खंड क्र. १), व अनिकेत शिरभाते (सरई) यांचा समावेश असलेल्या पथकाने अवैध रेती वाहतूक रोखण्यासाठी तात्काळ कार्यवाही करत सदर वाहने ताब्यात घेतली. जप्त करण्यात आलेल्या ट्रॅक्टरपैकी एक ट्रॅक्टर क्रमांक MH40BJ4425 असून त्याचे मालक विजय मारोती पवार आहेत. दुसरे ट्रॅक्टर क्रमांक MH27L5904 असून त्याचे मालक पृषोत्तम वाघाडे आहेत. सदर दोन्ही वाहने दंडात्मक कारवाईसाठी तहसील कार्यालय, राळेगाव येथे नेण्यात आली आहेत. अवैध रेती उत्खनन व वाहतूक ही पर्यावरण व नैसर्गिक साधनसंपत्तीला हानी पोहोचवणारी गंभीर समस्या असून महसूल प्रशासन यावर सतत लक्ष ठेवून आहे. या कारवाईमुळे महसूल विभागाच्या कार्यक्षमतेची आणि कायदा अंमलबजावणीतील तत्परतेची पुनःप्रचिती झाली आहे. तहसील प्रशासनाने यापुढेही अशा प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

## देसले कुटुंबीयांच्या कायमसोबत; लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून धीर



**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**
जम्मू काश्मीरमधील पहलगामच्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले दिलीप देसले यांच्या कुटुंबीयांची माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट घेत सात्वंन केले. कोणतीही मदत भासल्यास माझ्या घराचे दरवाजे देसले कुटुंबासाठी कायम उघडे आहेत. देसले यांचे निधन पनवेलकरांसाठी वेदनादायी आहे. मात्र यापुढे त्यांच्या पश्चात देसले कुटुंबीयांच्या कायमसोबत आहे, अशी ग्वाही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिली. पहलगाम येथे दहशतवाद्यांच्या भ्याड हल्ल्यात नवीन पनवेल येथील रहिवासी दिलीप देसले मृत्युमुखी पडले. त्यांच्या शोकाकूल कुटुंबाची खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गुरुवारी भेट घेत सांत्वन केले. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी धीर देत देसले कुटुंबीयांची विचारपूस केली. या हृदयद्रावक परिस्थितीत मी स्वतः कायम देसले कुटुंबासोबत आहे. कुटुंबाचा शोक मन हेलावणारा आहे. कोणत्याही प्रसंगात आम्ही देसले कुटुंबीयांच्या हाकेला धावत येऊ, हा माझा शब्द आहे, असे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगत देसले कुटुंबाला मोठा धीर दिला. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, ऍड. प्रकाश बिनेदार, समीर ठाकूर, जगदीश घरत, सुधाकर थवई, माजी नगरसेविका वृषाली वाघमारे, जितेंद्र वाघमारे आदी उपस्थित होते.

## कोयाळी( बु )येथील युवा सरपंच गजानन वानखडे आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानीत..

### सिने अभिनेता मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण..

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा/प्रतिनिधी**
**करण धोंगडे**
आदर्श सरपंच सन्मान "मान कर्तृत्वाचा सन्मान नेतृत्वाचा युवा सरपंच गजानन आनंदा वानखडे ग्रामपंचायत कोयाळी (बु )येथे उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल ,अहिल्यानगर येथे श्री. मकरंद अनासपुरे मराठी सिने अभिनेता,एकनाथराव ढाकणे ग्रामसेवक नेते,महाराष्ट्र राज्य यांच्या प्रमुख उपस्थितीत माऊली संकुल अहिल्यानगर येथे आदर्श सरपंच पुरस्कार




सोहळा कार्यक्रम संपन्न झाला,यावेळी रिसोड तालुक्यातील कोयाळी (बु )गावचे सरपंच गजानन वानखडे यांना आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले, यावेळी त्यांचे लहाने बंधू अनिकेत वानखडे, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर भिसडे,ग्रा. पं कर्मचारी रितेश वानखडे,सुमेध वानखडे,प्रशांत खरबळकर, उपस्थित हा पुरस्कार स्विकारला, गजानन वानखडे ( सरपंच ) आपल्या पदाच्या माध्यमातून करत असलेल्या कामांचे मान्यवरांनी कौतुक केले, कोणताही पुरस्कार मिळाला तर त्यातून निश्चितपने अधिक चांगले काम केले पाहिजे,असा या पुरस्कार देण्याचा उद्देश असतो, या पुरस्काराला अनुरूप असंच कार्य सतत भविष्यात करत राहावे अशी अपेक्षा मराठी सिने अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी पुरस्कार वितरनाच्या वेळी आपल्या भावना व्यक्त केल्या कोयाळी ( बु ) गावातील जनतेला आपल्या सरपंचला पुरस्कार मिळाल्यामुळे आनंद झाला, व गावासाठी असंच कार्य सतत करत राहावे,अशी अपेक्षा यावेळी गावकऱ्यांनी आहे,

### महाराष्ट्र दिनी राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे गावातील मातीचे पूजन....

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**
**चिपळूण प्रतिनिधी .-** महाराष्ट्र राज्य स्थापनेला 75 वर्ष पूर्ण होतायेत याच पार्श्वभूमीवरती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री नामदार अजितदादा पवार यांच्या संकल्पनेतून तसेच प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिलजी तटकरे साहेब तसेच आदरणीय आमदार शेखरजी निकम सर यांच्या सूचनेनुसार मंडणगड तालुक्यातील अंबडवेट गाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी च्या वतीने महाराष्ट्र राज्य स्थापनेला 75 वर्ष पूर्ण होत आहेत, या निमित्ताने महाराष्ट्र राज्य ही थोर संतांच्या महापुरुषाच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी या भूमी तील मंडणगड तालुक्यातील बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळगाव अंबडवेट गाव येथे जाऊन तेथील माती ही कलशात भरून त्याचे पवित्र्य जपत आणण्यात आली या वेळी चिपळूण तालुका अध्यक्ष नितीन( अबू )ठसाळे, मंडणगड तालुका अध्यक्ष मुजफारभाई मुकादम, महिला जिल्हा अध्यक्षा सौ.साधनाताई बोत्रे, प्रदेश सर चिटणीस सौ.रमा बेलोसे, सौ प्रीती जैन, युवक अध्यक्ष निलेश कदम, रोहित गमरे, मनोज जाधव, अल्लाद यादव, गणेश भुरण, रुपेश इंगवले, रवी महादे, प्रशांत महाडिक, संकल्प सुर्वे, राजू सुतार, प्रभाकर सैतवडेर, रमेश वरेकर, भालचंद्र पाचांगने, गणेश साबळे आदी मान्यवर उपस्थित होते.....*



## धक्काबुक्की, हाणामारी; आष्टी, पाटोदा, अंमळनेर पोलीस घटनास्थळी गाव कडकडीत बंद

**दैनिक युवक आधार**
**मारुती सत्रे**
**आष्टी प्रतिनिधी :** आष्टी तालुक्यातील खडकत मधील चौकात झेंडा लावण्यावरून आणि काढण्यावरून कालपासून दोन गट आमने-सामने आले आहेत. काल तहसीलदारांच्या उपस्थितीत झेंडा काढला गेला मात्र आज गावाबाहेरून शंभर ते दोनशे लोक खडकतमध्ये आले आणि पुन्हा गावात तणावाचे वातावरण निर्माण होत दोन गटात मारामाऱ्याही झाल्या. घटनेची माहिती कळताच आष्टी, पाटोदा, अंमळनेर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी तेथील तणाव निवळला असला तरी गाव कडकडीत बंद आहे. या प्रकरणी रात्री शंभर ते दीडशे जणांवर जमावबंदीचा आदेश धुडकावल्यासह अन्य कलमाखाली गुन्हा दाखल आहे. आज चिघळलेल्या वातावरणात दोषींवर कारवाई केली जाणार असल्याचे सांगण्यात येते. सध्या गावात तणावाचे वातावरण आहे. आष्टी तालुक्यातील खडकत गावात एक चौक असून या चौकामध्ये सुरुवातीपासून एक झेंडा आहे. जयंतीदिनी अन्य एक झेंडा त्याठिकाणी लावण्यात आला. जयंती संपल्यानंतर तो झेंडा काढला जावा, असे काहींचे म्हणणे होते. यावरून काल दोन गट आमने-सामने आले. दोघांमध्ये वाद झाला. याची माहिती प्रशासनाला समजल्यानंतर घटनास्थळी पोलिसांसह



तहसीलदार वैशाली पाटील या डेरेदाखल झाल्या. त्यांनी उपस्थित समाजासमोर एक झेंडा हटवला. या प्रकरणी रात्री शंभर ते दीडशे जणांवर जमावबंदी व लोकसेवकाचा आदेश न पाळल्याबाबत गुन्हाही दाखल झाला मात्र रात्री पुन्हा गावाबाहेरून काही लोक खडकत या गावामध्ये दाखल झाले. आज सकाळी पुन्हा झेंड्यावरून दोन गट आमने-सामने आले. दोन गटात शाब्दीक चकमक होऊन हाणामारीचीही घटना घडल्याचे सांगण्यात येते. घटनास्थळी आष्टी, पाटोदा, अंमळनेर पोलीस डेरेदाखल आहेत. पोलिसांच्या अन्य दोन तुकड्याही त्याठिकाणी पाठवण्यात आल्या आहेत. सध्या गावात तणावपुर्ण वातावरण असून खडकत गाव कडकडीत बंद आहे. या प्रकरणी अद्याप कुणाला ताब्यात घेण्यात आलेले नसले तरी प्रशासनाने या घटनेचा व्हिडिओ काढलेला आहे. त्यांनुसार वाद निर्माण करणाऱ्या दोन्ही गटातील लोकांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले जाते.

## संजनाच्या प्रयत्नाने राणी अवंतीबाई लोधी वाचनालय व अभ्यासिका केंद्राची सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड गोंदिया**
राणी अवंतीबाई लोधी च्या प्रेरणेने संजना शिक्षणाच्या क्षेत्रात काम करत आहे : इंजि राजीव ठकरेले तिरोडा तालुक्यातील सालेबर्डी गावात अंजीलाल बोहणे यांनी आपल्या क्षेत्रात सन 2000 ते 2008 मध्ये जवळपास १० वाचनालय सुरू केले होते यांच्या उद्देश होता की आपल्या क्षेत्रातील जास्तच जास्त मुला-मुली स्पर्धा परीक्षेत भाग घ्यावा आणि त्यात उत्तीर्ण होऊन आपल्या कुटुंब सह क्षेत्राचाही नाव रोशन करावा पण शासनाच्या अटीसरती व नियम यात त्यांची गाडी अटकली व हळूहळू एक एक वाचनालय बंद होत गेल्या त्यातच सालेबर्डी गावात सुरू केलेली सन 2008 मध्ये डॉक्टर सेवकलाल बोहणे नावाने सुरू केलेली वाचनालय हे ही बंद पडली. वडिलांच्या स्वप्नाला पूर्ण करण्यासाठी तसेच आपल्या गावात एकही सरकारी कर्मचारी नाही आता आपल्याला गावात शिक्षणाविषयी जागरूकता आणून स्पर्धा परीक्षा ला पुढे जाऊन त्यात उत्तीर्ण होऊन गावात जास्त सरकारी कर्मचारी तसेच उच्च पदाधिकारी व्हायला पाहिजे या जिद्दीने अंजीलाल बोहणे यांची मुलगी संजना बोहने हिच्या प्रयत्नाने काल दिनांक 24 एप्रिल 2025 ला डॉ सेवकलाल बोहने वाचनालय तसेच राणी अवंतीबाई लोधी अभ्यासिका



केंद्राचे शुभारंभ ओबीसी समाजाचे नेते व कृषी उत्पन्न बाजार समिती गोंदिया चे संचालक इंजि राजीव ठकरेले यांच्या अध्यक्षतेखाली माननीय राधेलालजी पटले (उपाध्यक्ष डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह सेंट्रल बँक गोंदिया) व माननीय अनंतलाल दमाहे (राष्ट्रीय अध्यक्ष आलोक संघ )यांच्या संयुक्त हस्ते करण्यात आला तसेच प्रमुख पाहुणे म्हणून वनिताताई भांडारकर (पंचायत समिती सदस्य) वनितताई ठाकरे (अध्यक्षा मानवाधिकार संघ गोंदिया) ज्ञानेश्वर दमाहे (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष) महेंद्र लिल्हारे, (जिल्हा प्रतिनिधी न्यूज प्रभात मीडिया) खुशाल नागपुरे, नानेश्वर बिरणवार इत्यादी मान्यवर उपस्थित होते त्याचप्रमाणे कार्यक्रम चा आयोजन अंजीलाल बोहणे,हितेश कुमार निनावे, विजय कुमार बोहने, सोमप्रकाश बाभरे, शुभम जवरे इत्यादींनी केला तसेच कार्यक्रम चा संचालन नंदकिशोर बोबडे यांनी केला तर प्रस्तावना संजना बोहणे हिने ठेवली तर आभार प्रदर्शन राकेश अटरे यांनी केला. शिक्षके दिशेने हा एक मोठा मोठी कामगिरी संजना आणि यांच्या संपूर्ण टीम तसेच गावकऱ्यांनी केला यासाठी संपूर्ण क्षेत्रात या कार्याची कौतुक होत आहे

# पाकिस्तानविरुद्ध मुंब्र्यातील हजारो लोक रस्त्यावर

## पाकिस्तान मुर्दाबादचे नारे, महिलांचा मोठा सहभाग



**ठाणे :** पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या नेतृत्वाखाली तसेच सय्यद अली यांच्या उपस्थितीत शुक्रवारी मुंब्रा परिसरात विविध ठिकाणी निषेध आंदोलन करण्यात आले. काळे झेंडे दाखवित; पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा देत हजारो मुंब्रावासीयांनी रस्त्यावर उतरून दहशतवादी कृत्याचा निषेध केला.

काश्मीरच्या पहलगाम भागात दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला आहे. या हल्ल्याचा निषेध करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे कळवा-मुंब्रा विधानसभा क्षेत्राचे अध्यक्ष शमीम खान आणि शानु पठाण यांच्या आवाहनानुसार हजारो मुंब्रावासीयांनी रस्त्यावर उतरून आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या. जुम्माचा नमाज अदा केल्यानंतर हजारो लोक सुरुवातीला कौसा जामा मशिदीबाहेर जमा झाले. तिथे निदर्शने केल्यानंतर रिझवी बाग मस्जिद, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष कार्यालय, तनवीर नगर येथे आंदोलन केले. या प्रसंगी शमीम खान यांनी रास्ता रोकोदेखील केला.

> पहलगाम येथील हत्याकांडास जेवढे दहशतवादी जबाबदार आहेत. तेवढेच जबाबदार केंद्र सरकारही आहे. अतिरेक्यांच्या हिटलिस्टवर असलेल्या परिसरातील सुरक्षा व्यवस्था डळमळीत का होती? येथील लष्कराचे जवान कुठे होते? पहलगाम हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांच्या अंत्ययात्रा पाहून देशातील प्रत्येक घरात अश्रू दाटले. त्यामुळेच मुंब्रा-कौसातील बांधवांनी नमाज अदा केल्यानंतर प्रत्येक नाक्यावर पाकिस्तानचा निषेध करणारे आंदोलन केले. हे आंदोलन माणुसकीचे प्रतिक आहे.
>
> - डॉ.जितेंद्र आव्हाड



# दिव्यात कडकडीत बंद; पाकचा झेंडाही जाळला

**ठाणे :** काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ शुक्रवारी दिवा शहरातील दिवा मर्चंट व्यापारी संस्थेमार्फत दिवा शहर बंदची हाक देण्यात आली होती. व्यापारी संघटनेच्या अध्यक्षा ज्योती राजकांत पाटील यांनी व्यापाऱ्यांना केलेल्या आवाहनानंतर दिवा शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. दिवा शहरातील व्यापाऱ्यांनी रस्त्यावर उतरून दहशतवाद्यांचा निषेध केला.

दिवा शहरातील व्यापाऱ्यांनी पाकिस्तानच्या या कृत्याचा निषेध करत पाकिस्तानचा झेंडा जाळला. त्याचबरोबर या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना व्यापारी संघटनेच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २८ भारतीय नागरिक मृत्युमुखी पडले होते. यानंतर देशभरात शुक्रवारी दिवा शहरात व्यापारी संस्थेच्या वतीने कडकडीत बंद पाळण्यात आला.

व्यापारी संस्थेच्या अध्यक्षा ज्योती पाटील यांनी दिवा शहरातील सर्व दुकानदार व व्यापाऱ्यांना आपले व्यवसाय दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ बंद ठेवण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला दिवा शहरातील दुकानदार, व्यापाऱ्यांनी प्रतिसाद देत दिवा शहरात कडकडीत बंद पाळत दहशतवादी कृत्याचा निषेध केला.

# काश्मीरमधील हल्ल्यानंतर पर्यटकांकडून बुकिंग रद्द

**डोंबिवली :** जम्मू - काश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या गोळीबारामध्ये २८ पर्यटकांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर काश्मीरमध्ये फिरण्यासाठी जाणाऱ्या पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. जे पर्यटक काश्मीर-श्रीनगर येथे आहेत ते आपल्या घरी लवकर लवकरात कसे पोहोचता येईल, याकरिता प्रयत्न करत आहेत. तर ज्यांनी तिकडे जाण्याकरिता बुकिंग केल्या होत्या, त्या नागरिकांनी आता बुकिंग रद्द करण्याचे प्रयत्न सुरू केले असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. काश्मीरचे नव्हे तर काश्मीरच्या आजूबाजूला असलेले लडाख, गुलबर्ग आदी भागात जाण्यासाठी केलेल्या बुकिंग देखील भीतीपोटी रद्द करण्यात आल्या आहेत.

याबाबत एका ट्रॅव्हल्स मालकाने संगितले की, ३७० कलम हटवल्यानंतर काश्मीर व आजूबाजूच्या परिसरात जाण्याऱ्या पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली होती. सुट्ट्यांमध्ये ६०० ते ७०० बुकिंग होत होत्या. मात्र दहशतवाद्यांनी हल्ला केल्याची घटना घडली आणि त्यानंतर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे काश्मीरची बुकिंग रद्द करण्यासाठी आम्हाला दिवसभर फोन येत असल्याचे ट्रॅव्हल्स मालकाने म्हटले आहे. हल्ला होण्याच्या आदल्या दिवशी देखील बुकिंगसाठी फोन येत होते.

# पहलगाम हत्याकांडाचा शिंदेसेना, मनसेकडून निषेध



**भाईंदर :** काश्मीरच्या पहलगाममध्ये निष्पाप भारतीयांची धर्म विचारून अतिरेक्यांनी केलेल्या हत्याकांडाचा मीरा-भाईंदरमध्ये शिंदेसेना व मनसेने जाहीर निषेध करत मृतांना श्रद्धांजली वाहिली.

भाईंदर पूर्वेच्या गोल्डन नेस्टजवळील सावरकर चौकात शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख राजू भोईर यांच्या नेतृत्वाखाली हत्याकांडाचा निषेध केला गेला. यावेळी जिल्हा संघटक निशा नार्वेकर, विधानसभा क्षेत्र प्रमुख विक्रमप्रताप सिंह व सचिन मांजरेकर, पूजा आमगावकर, संकेत गुरव, रामभवन शर्मा, केशव बटावळे, वासिदेव राणे, अर्चना कदम, अंकिता सावंत, शिवशंकर तिवारी, सुमन टाक, शर्वरी सावंत आदींसह शिवसैनिक उपस्थित होते. यावेळी शिवसैनिकांनी भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ घोषणा देत अतिरेक्यांच्या ७ पिढ्यांना जरब बसेल अशी कारवाईची मागणी केली. हल्ल्यात मरण पावलेल्याना मेणबत्त्या लावून श्रद्धांजली वाहण्यात आली.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून मीरारोडच्या बालाजी हॉटेल नाका येथे भ्याड अतिरेकी हल्ल्याचा निषेध पाकिस्तानी झेंडा पायदळी तुडवून करण्यात आला.

## पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर द्यावे – महेश गायकवाड



**कल्याण :** जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देश हादरला आहे. या भ्याड हल्ल्यात २६ निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला. या हल्ल्याबाबत देशभरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. सरकारने आता दहशतवाद्यांना आणि पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर द्यावे, अशी मागणी होत आहे. कल्याण पूर्वेतील खडेगोळवली येथे जोरदार आंदोलन करण्यात आले. या निषेधादरम्यान नागरिकांनी कँडल मार्च काढून शहिदांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी पाकिस्तानच्या विरोधात घोषणाबाजी करत हल्ल्याचा तीव्र निषेध केला. या आंदोलनात माजी नगरसेवक महेश गायकवाड यांच्यासह महादेव रायभोळे, माजी उपमहापौर उमेश म्हात्रे, युवा सेनेचे मधुर म्हात्रे, महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांसह सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नांदेडसह जिल्ह्यात कडकडीत बंद



**नांदेड :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे पाकिस्तानी मुस्लिम दहशतवाद्यांनी घडवून आणलेल्या हत्याकांडाच्या निषेधार्थ शुक्रवारी नांदेडमध्ये कडकडीत बंद पाळण्यात आला. भाजपसह सर्व राजकीय पक्षांनी या बंदला पाठिंबा दिला होता. व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने या बंदमध्ये सहभाग नोंदवत आपली दालन बंद ठेवली होती. खासगी शाळांनीही विद्यार्थ्यांना सुट्टी दिली होती. तसेच घटनेच्या निषेधार्थ शहरातील राज कॉर्नर ते जुना मोंढापर्यंत मोटारसायकल रॅली काढण्यात आली. शिवसेना (उबाठा) च्यावतीने पाकिस्तानचा प्रतिकात्मक झेंडा जाळून निषेध करण्यात आला.

नांदेडसह जिल्ह्यातील उमरी, नायगाव, मुदखेड, हदगाव, किनवट, हिमायतनगर, कंधार येथेही बंद पाळण्यात आला. नायगाव येथे हिंदुत्ववादी संघटनेच्या वतीने रास्तारोको आंदोलन करण्यात आले. आंदोलन कर्त्यांनी जिल्हा प्रशासनाला निवेदन देऊन भ्याड हल्ल्याचा निषेध करताना आरोपींविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

बंद दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये; यासाठी पोलिसांचा बंदोबस्त शहरात तैनात करण्यात आला होता. संवेदनशिल भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अनेक ठिकाणी राज्य राखीव दल, गृहरक्षक दलाचे जवान व पोलीस कर्मचारी व अधिकारी तैनात होते.

## दहशतवादी हल्ल्याचा मुस्लिम बांधवांकडून निषेध



**कर्जत :** जम्मू काश्मीरमधील पहलगमच्या बैसरान घाटीमध्ये २२ एप्रिल रोजी पर्यटकांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला. या हल्ल्यात २८ निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला. या भीषण हल्ल्याचा कर्जतमधील मुस्लिम बांधवानी निषेध केला आहे. या हल्ल्याचा निषेध करण्यासाठी कर्जतमधील मुस्लिम बांधव येथील मस्जिदी समोर मोठ्या संख्येने जमा झाले. त्यांनी राष्ट्रध्वज हातात घेऊन या घटनेचा निषेध नोंदविला. याप्रसंगी मुस्लिम समाज चे अध्यक्ष सैदु शेख, उपाध्यक्ष अब्बास शेख, शाहनवाज मुल्ला, शादाब शेख, आरीफ चौगुले, नदीम खान, बिलाल आढाळ आदींसह मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पहलगाम हल्ला प्रकरणी काँग्रेसतर्फे निषेध : प्रांताना दिले निवेदन.

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**
**चिपळूण प्रतिनिधी**




जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे पर्यटकांवर दहशतवाद्यांकडून झालेल्या भ्याड हल्ल्याचा चिपळूण तालुका काँग्रेस कडून तीव्र निषेध करण्यात आला असून सरकारने या विरोधात जशास तसे उत्तर देऊन दहशतवाद्यांवर कडक कारवाई करावी या मागणीचे निवेदन काँग्रेसच्या वतीने प्रांताधिकारी आकाश लिगाडे यांना देण्यात आले आहे. २२ एप्रिल रोजी काश्मीर पहलगाम येथे विविध भागातून पर्यटनांसाठी गलेल्या पर्यटकांवर अंधाधुंद गोळीबार करून २६ निष्पाप पर्यटकांची हत्या केली गेली. यामुळे देशभरात संतापाची लाट उसळली आहे. भारताच्या सार्वभौमत्वावरील या भ्याड हल्ल्याचा चिपळूणात ही पडसाद उमटले आहेत. या पाश्वभूमीवर चिपळूण तालुका काँग्रेसच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करून प्रांताधिकारी यांना निवेदन देण्यात असून दहशतवाद्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे .यावेळी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष लियाकत शाह, सेवादल जिल्हाध्यक्ष तुळशीराम पवार, माजी नगरसेवक कबीर काद्री,शहराध्यक्ष संतोष सावंत देसाई,तालुका उपाध्यक्ष सुबोध सावंत देसाई, जिल्हा सरचिटणीस राजेंद्र भुरण, दादा आखाडे,सुनील खेडेकर, नंदकुमार कामत, महिला तालुकाध्यक्ष निर्मला जाधव,शहराध्यक्ष विणा जावकर माजी नगरसेवका सफा गोठे आदी उपस्थित होते.

# सातारा जिल्ह्यातील ७ प्रवासी शनिवारी सुखरूप परतणार

### श्रीनगर ते नवी दिल्ली विमानाने, तर नवी दिल्ली ते सातारा, कराड रेल्वे प्रवास

**कराड :** जम्मू-काश्मीरमध्ये पर्यटनासाठी गेलेल्या आणि अतिरेकी हल्ल्यामुळे तिथेच अडकून पडलेल्या सातारा जिल्ह्यातील कराड व सातारा येथील ७ पर्यटक शनिवारी (दि. २६) रात्री उशिरा आपापल्या ठिकाणी सुखरूप पोहोचणार आहेत. त्यामुळे गेले गेले चार-पाच दिवस चिंतेत असणारे त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रमंडळींसह सर्वांनीच सुटकेचा निःश्वास सोडला. शुक्रवारी दुपारी २ वा. नवी दिल्ली येथे आले असून रात्री उशिरा ते नवी दिल्ली येथून सातारा, कराडला रवाना झाले असल्याने शनिवारी रात्री येथे पोहोचणार असल्याची माहिती समोर आली आहे.

सदर ७ पर्यटक श्रीनगर ते नवी दिल्ली विमानाने दाखल झाले आहेत तर नवी दिल्ली ते सातारा,कराडला येण्यासाठी नवी दिल्ली येथून दर्शन एक्स्प्रेस रेल्वेने रवाना झाले आहेत. कराडमधील इंटेरियर डिझायनर महेश मिलिंद कुलकर्णी हे आपल्या कुटुंबासमवेत काश्मीरला पर्यटनाला गेले होते. त्यांच्यासमवेत माधवी मिलिंद कुलकर्णी, श्रीधर शामराव क्षीरसागर, वर्षा श्रीधर क्षीरसागर, सुखदा श्रीधर क्षीरसागर हे कराडचे रहिवाशी; तर शरद हरिभाऊ पवार व विद्या शरद पवार हे साताराचे दोघे पर्यटक असे जिल्ह्यातील ७ पर्यटक या हल्ल्यामुळे श्रीनगरमध्ये अडकून पडले होते. दरम्यान, या अतिरेकी हल्ल्यामुळे सर्वत्रच घबराटीचे वातावरण पसरल्याने पर्यटकांनी पुन्हा आपापल्या गावी जाण्यासाठी हालचाली सुरू केल्या. त्याचवेळी केंद्र व राज्य सरकारनेही काश्मीरमध्ये अडकलेल्या पर्यटकांना आपापल्या ठिकाणी परत पोहचविण्यासाठी विमान व रेल्वेच्या अतिरिक्त सेवा सुरू केल्या. यामध्ये श्रीनगर ते नवी दिल्ली विमान तर नवी दिल्ली येथून वेगवेगळ्या ठिकाणी अतिरिक्त रेल्वे गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला. त्याचा या पर्यटकांना मोठा दिलासा मिळाला. दरम्यान, गेले चार दिवस चिंतेत असलेले कुटुंबीय, मित्रमंडळींनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

# मुख्याध्यापक गहिनीनाथ तोतरे सर यांचा सेवापूर्ती समारंभ

**दैनिक युवक आधार**
**बाळासाहेब रकटाटे**
**आष्टी प्रतिनिधी**

माणसाच्या जीवनामध्ये अनेक वेळा निरोप घेण्याचा प्रसंग येतो हा निरोप आईच्या उदरापासून सुरू होतो त्यानंतर प्राथमिक शाळा माध्यमिक शाळा व्यावसायिक शैक्षणिक संस्था किंवा कॉलेज नंतर नोकरी व बदलीच्या वेळी शाळेचा निरोप व सेवा पूर्ण केल्यानंतर सेवापूर्ती समारंभ प्रत्येक ठिकाणी निरोप देताना आपल्या आठवणी जडलेल्या असतात शाळेतून बदली झाली की त्या शाळेचा निरोप घेताना अंतकरण जड होते कारण त्या ठिकाणी आपण काही दिवस सेवा केलेली असते गावाशी विद्यार्थ्यांशी आपलं नातं जडलेलं असतं. सर्वात महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे सेवापूर्ती समारंभ सोहळा गहिनीनाथ नामदेव तोतरे सर हे जी.प. प्रा .शाळा सुरुडी या ठिकाणाहून वयाची 58 वर्षे पूर्ण झाल्याने मुख्याध्यापक पदावरून सेवानिवृत्त होत आहेत शनिवारी 26 एप्रिल रोजी सकाळी 9:00 वाजता हा कार्यक्रम संपन्न होत आहे प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्व हे आगळ वेगळ असते तोतरे सरांना परिसरामध्ये सर्वजण( मामा ) म्हणतात. त्यांचे मूळ गाव डोईठण हे आहे तशी सरांची सेवा डोईठण परिसरातील हातोला कारखेल डोईठाण या परिसरातच गेली . तोतरे सरांचा जन्म डोईठाण या ठिकाणी 20/ 5/ 67 यावर्षी झाला. प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर 1985 ला दहावी उत्तीर्ण झाले. या काळात डीएड पदवी घेतल्यानंतर झटपट नोकरी लागायची म्हणून शिक्षक होण्यासाठी दहावीला चांगले मार्क असल्यामुळे उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम या ठिकाणी डीएडला प्रवेश घेतला शिक्षण पूर्ण झाल्यानंतर 5/8/1988 ला नागतळा या ठिकाणी त्यांना प्रथम नेमणूक मिळाली. यानंतर गोवर्धन हिवरा भवरवाडी हातोला कारखेल हिंगेवाडी गरजेवाडी कापसे सुरडी या ठिकाणी त्यांनी ज्ञानदानाचे कार्य केले.



तोतरे सर कमी बोलणारे मितभाषी पण स्वभाव मात्र खळखळ वाहणाऱ्या झऱ्यासारखा एकदम स्वच्छ कधी कोणाविषयी राग नाही की लोभ नाही आपले काम प्रामाणिकपणे करणे. हा त्यांचा स्वभाव सरांचा व मी महादेव आमले माझा संबंध कारखेल बु. च्या शाळेवर आला 2002 ला मी शिक्षक म्हणून कारखेल बुद्रुक या ठिकाणी रुजू झालो त्यावेळेस त्या ठिकाणी कै.तरटे सर सिताराम जाधव माझ्याबरोबर रुजू झालेले बापू सानप सर व तोतरे सर शाळेवर होते मी डोईठण या ठिकाणी राहावयास होतो पगार कमी असल्याने आर्थिक चणचण होतीच सुरुवातीचे तीन वर्ष गाडी घेणे शक्य नव्हते डोईठण ते कारखेल रोज जाणे येणे तोतरे मामांकडे गाडी होती महिनाभर मी त्यांच्याबरोबर प्रवास केला महिना भरल्यानंतर मधल्या सुट्टीत जाण्या येण्याचे पैसे घेऊन त्यांच्याकडे गेलो पैसे घेण्यास त्यांनी साफ नकार दिला व सांगितले की पैसे द्यायचे असेल तर माझ्याबरोबर येऊ नका पुढे तीन वर्ष एक रुपया न घेता त्यांनी बरोबर आणले व नेले तात्पर्य एवढेच की त्यांच्यामध्ये सहकार्य वृत्ती खूप आहे परिस्थितीची जाणीव ठेवणारे सर आहेत.

सर शाळेची वेळ फार पाळायचे अत्यंत शिस्तबद्धता त्यांच्या अंगी आहे कमी बोलणारे असून सुद्धा त्यांच्या मित्रपरिवार चांगला आहे अनेक मित्र त्यांनी जोडलेले आहेत विद्यार्थ्यांसाठी त्यांनी तन-मन-धनाने काम केले कारखेल बु .या ठिकाणी चौथीपर्यंतची शाळा त्यांच्या काळात सातवीपर्यंत गेली. 2017 च्या स्वामी विवेकानंद शिक्षकांची पतसंस्था मर्यादितची निवडणूक आम्ही बरोबर लढवली. सरांची पतसंस्थेच्या सचिव पदी निवड झाली. अत्यंत चोखपणे त्यांनी पतसंस्थेचा कारभार पाहिला. या काळात नेहमी गाठीभेटी होत असे. सरांच्या स्वभावामध्ये रागवणे हा शब्द नाही. अत्यंत स्वजवळ स्वभाव असणारे तोतरे मामा सगळ्यांशी मिळून मिसळून राहिले. पतसंस्थेच्या सचिव पदी असताना त्यांनी कधीही गर्व केला नाही. गर्वाचा लवलेशही त्यांच्यामध्ये नव्हता. अगदी साधा सरळ स्वभावाचे तोतरे सर आहेत

प्रामाणिकपणे केलेले सेवेचे फळ म्हणून त्यांचा मुलगा प्रशासकीय सेवेत आहे मुलगी ही इंजिनियर आहे त्यांच्या पत्नी डोईठण या ठिकाणी सहशिक्षिका पदावर कार्यरत आहेत .26 एप्रिल 2025 रोजी ते सेवानिवृत्त होत आहे मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम शनिवारी संपन्न होत आहे. या सेवानिवृत्तीच्या कार्यक्रमास तालुक्यातील सर्व शिक्षकांनी उपस्थित रहावे असे विनंती गहीनाथ तोतरे सर यांनी केली आहे. त्यांना सेवानिवृत्तीचे आयुष्य निरोगी व आनंदी लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

# 'कचरायुक्त घाटंजी झाली कचरामुक्त 'मुख्यधिकारी घाटंजी ठरत आहे घाटंजी कराचे स्वच्छता दूत

## अभियंता ते मुख्याधिकारी राजुजी घोडके यांनी तीन वर्षांच्या अथक प्रयत्नांनी साकारले स्वच्छ घाटंजीचे स्वप्न!

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी (प्रतिनिधी - महेश पेंन्दोर)**



**घाटंजी:** कधीकाळी कचऱ्याच्या साम्राज्यात हरवलेली घाटंजी नगरी आज स्वच्छतेच्या नंदनवनाप्रमाणे दिसत आहे. या बदलाचे शिल्पकार आहेत, येथील विद्यमान मुख्याधिकारी राजुजी घोडके! त्यांनी केवळ अधिकारी म्हणून नव्हे, तर एक 'स्वच्छता दूत' म्हणून घाटंजीकरांच्या मनात आपले स्थान निर्माण केले आहे. घोडके यांनी, घाटंजी नगरपरिषदेत पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता म्हणून रुजू झाल्यापासूनच शहराला कचरामुक्त करण्याचा दृढ संकल्प केला होता. गेल्या तीन ते चार वर्षांपासून त्यांनी 'कचरामुक्त घाटंजी' ही मोहीम अत्यंत तळमळीने चालवली. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांची मुख्याधिकारी म्हणून पदोन्नती झाली, तरीही त्यांच्यातील स्वच्छता आणि वृक्षारोपणाचा ध्यास जराही कमी झाला नाही. उलट, अधिक जोमाने त्यांनी शहरातील सौंदर्य वाढवण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवले. घाटंजी शहरातील प्रत्येक प्रभागातील सार्वजनिक ठिकाणी साचलेला कचरा आणि त्यामुळे नागरिकांना होणारा त्रास त्यांनी प्रत्यक्ष अनुभवला. या समस्येवर मात करण्यासाठी त्यांनी प्रभावी उपाययोजनांची मालिकाच सुरू केली. जागोजागी कचराकुंड्या बसवणे, नियमित कचरा उचलण्याची व्यवस्था करणे आणि नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करणे यावर त्यांनी विशेष लक्ष केंद्रित केले. या प्रयत्नांचेच प्रतीक म्हणून, यावर्षी गुढीपाडव्याच्या शुभदिनी नेहरू नगर येथे 'कचरा टाकू नये' असा संदेश देणारी आकर्षक स्वच्छतेची गुढी उभारण्यात आली. हा केवळ एक फलक नसून, प्रत्येक घाटंजीकराला स्वच्छतेची प्रेरणा देणारा एक संदेश आहे. घाटंजीची हिरवळ कायम राहावी, यासाठी मुख्याधिकारी घोडके यांनी ३००० वृक्षांची लागवड केली. विशेष बाब म्हणजे, यापैकी तब्बल २९०० झाडे आज दिमाखाने उभी आहेत आणि त्यांच्यामुळे घाटंजी शहराला एक सुंदर आणि मनमोहक हिरवीगार रूप प्राप्त झाले आहे. अखेरीस, हे म्हणणे वावगे ठरणार नाही की, राजुजी घोडके यांनी आपल्या अथक प्रयत्नांनी कचरायुक्त घाटंजीला खऱ्या अर्थाने 'कचरामुक्त' केले आहे. ते केवळ मुख्याधिकारी नाहीत, तर घाटंजीकरांसाठी एक आदर्श आणि 'स्वच्छता दूत' ठरले आहेत!

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

द•ख•ल

## उरण तालुक्यातील 23 ग्रामपंचायती क्षयरोगमुक्त घोषित; घारापुरीसह सर्वांचा सन्मान

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2025 पर्यंत भारत क्षयरोगमुक्त करण्याचे ध्येय समोर ठेवले आहे. या पार्श्वभूमीवर 24मार्च2023 पासून "क्षयरोगमुक्त पंचायत" हा अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला. याच उपक्रमाअंतर्गत उरण तालुक्यातील घारापुरी ग्रामपंचायतीसह एकूण 23 ग्रामपंचायतींना क्षयरोगमुक्त घोषित करून मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले. सन 2024-25 या कालावधीत तालुक्यातील 35ग्रामपंचायतींनी क्षयरोगमुक्तीच्या नामांकनासाठी आपले दावे सादर केले होते. त्यांची काटेकोर पडताळणी झाल्यानंतर २३ ग्रामपंचायती अंतिमतः क्षयरोगमुक्त म्हणून घोषित करण्यात आल्या. घारापुरी, भेंडखळ, पुनाडे, वशेणी, चिरले, धुतुम, डोंगरी, हनुमान कोळीवाडा, पाणजे, मोठीजुई, बांधपाडा, दिघोडे, करळ, नवीन शेवा, सोनारी, वेश्वि, विंधणे, जसखार, कळणबुसरे, जासई, केगाव, चिरनेर व चाणजे या ग्रामपंचायतींचा त्यात समावेश आहे. या सन्मानप्राप्त कार्यक्रमात घारापुरी ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच, उपसरपंच, सदस्य आणि ग्रामसेवक यांनी पुरस्कार स्विकारले.



## युवा उदोजक प्रमोद टकले यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम राहखलं

**दैनिक युवक धन्यवाद**
**सणसर :- विकास क्षत्रिय..**

बारामती तालुक्यातील ढेकळवाडी गावातील युवा उदयोजक मा.प्रमोद टकले यांच्या वाढदिवसानिमित्त बोरी व मुर्टी येथील निवासी मूकबधीर विद्यालय आश्रम शाळेत खाऊ व शालेय साहित्य करून आपला वाढदिवस साजरा करण्यात आला.वाढदिवसानिमित्त भवानीनगर येथील डॉ.महेश घोळवे यांच्या हॉस्पिटलमध्ये रक्तदान शिबीराचे आयोजन करून 106 बाटल्या रक्त संकलन करण्यात आले. तसेच संजयनगर येथील जिल्हा परिषद शाळेतील विध्यार्थी यांना खाऊ व शालेय साहित्य वाटप करण्यात आले. आपण समाजाचे काही तरी देणे लागत असल्यामुळे युवा उदयोजक प्रमोद टकले यांनी सामाजिक बांधलीकी जपत अगदी साध्या पद्धतीने आपला वाढदिवस साजरा करण्यात आला.




## ४८ कोटींची अमृत २.० वाढीव पाणी पुरवठा योजना राळेगाव करिता मंजूर

### आमदार भावनाताई गवळी यांच्या पाठपुराव्याला यश

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:**
**-जितेंद्र खोडे**



**राळेगावः**-महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अमरावती यांच्या कडून राळेगाव येथील केंद्र पुरस्कृत अमृत २.० या योजनेस तांत्रिक मंजुरात मिळाली आहे. यामुळे शहराची वाढीव पाणीपुरवठा योजना आता मार्गी लागण्याची शक्यता वाढली आहे.भावना गवळी यांनी अध्यावत पाणी फिल्टर सह ही ४८ कोटींची पाणी पुरवठा योजना राळेगाव येथे व्हावी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. अमरावती येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे मुख्य अभियंता एस. एस. गव्हाणकर यांनी विविध अटी व शर्थीस अधीन राहून राळेगाव येथील या वाढीव पाणीपुरवठा योजनेस तांत्रिक मंजुरीचे आदेश दिले आहे.केंद्र पुरस्कृत या योजने करिता पुढील तीस वर्षा करिता नदी प्रकल्पाच्या खालील वर्धा नदीतून पाणी आरक्षित ठेवण्याबद्दल अधीक्षक सिंचन मंडळ यवतमाळ यांना यापूर्वीच सूचित केले होते. दरम्यान राळेगाव नगरपंचायत मधील कॉंग्रेसचे उपनगराध्यक्ष जानराव गिरी व त्यांच्या काही सहकाऱ्यांनी आमदार भावना गवळी यांचे नेतृत्वाखाली खासदार श्रीकांत शिंदे यांचे उपस्थितीत शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. या पार्श्वभूमीवर या योजना मंजुरीच्या घटनेला महत्व प्राप्त झाले आहे.

# आष्टी तालुक्यातील दहा गावांना पाणीटंचाई च्या झळा; टॅंकरसाठी तहसील कार्यालयाकडे प्रस्ताव दाखल

**दैनिक युवक आधार**
**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यात उष्णतेच्या तीव्र लाटेने अंगाची लाही लाही होत आहे.४० पार तापमान जात असल्याने बाहेर पडणे मुश्किल झाले आहे.उन्हाच्या झळांसोबतच तालुक्यातील जलसाठा कमी झाला आहे. नदी-नाले तर कोरडेठाक झाले आहेत. पाणीपातळीने तळ गाठला आहे.ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना आता पाणीटंचाई च्या झळा बसू लागल्या आहेत.अद्यापर्यंत तालुक्यात एकही टॅंकर चालु मंजूर नसून टॅंकर सुरू करण्यासाठी १० गावांनी तहसिलदार



> आष्टी तालुक्यातील जवळपास १० गावांचे टॅंकर साठी प्रस्ताव तहसिल कार्यालयात सादर करण्यात आले आहेत.यातील २ गावांची स्थळी पाहणी शुक्रवारी करण्यात आली असून हे प्रस्ताव उपविभागीय अधिकारी पाटोदा यांच्याकडे पाठविण्यात येणार आहेत. जिल्हाधिकारी यांची मान्यता मिळाल्यानंतर टॅंकर सुरू करण्यात येणार आहेत.
> **- जयदत्त चव्हाण ( सहाय्यक महसूल अधिकारी,आष्टी)**

कार्यालयाकडे प्रस्ताव दाखल केले असून हि गावे टॅंकरच्या प्रतिक्षेत आहेत. आष्टी तालुक्यातील १० गावात यंदाही पाणीटंचाई आहे. गावातील तलाव पूर्ण कोरडे पडल्याने गावाशेजारील विहिरीहून महिलांना पाणी आणावे लागत आहे. टॅंकरद्वारे पाणीपुरवठा सुरु झाल्यास विहीरीत पाणी सोडले जाते आणि मग ते पाणी गावांना पाणीपुरवठा होतो. सद्यस्थितीत अनेक गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई जाणवत आहे. अनेक विहिरींनी तळ गाठला आहे. तर तलाव कोरडेठाक पडले आहेत.ग्रामस्थांवर पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ आली आहे.जसजसा उन्हाळा वाढतोय तसतशी पिण्याच्या पाण्याची टंचाई वाढत असून टॅंकर मागणी देखील वाढण्याची शक्यता आहे.तालुक्यात बीड सांगवी, कणसेवाडी,गुंडवाडी गंणगेवाडी,भोजेवाडी, पांगरा,कारखेल,पाटसरा,अंभोरा, खरडगव्हाण, सोलापूरवाडी,काकडेवाडी यांचे प्रस्ताव पाठवायचे असून चिंचेवाडी व जळगाव या दोन गावांचे प्रस्तावाचे स्थळ पाहणी होणे बाकी आहे.या गावांत पिण्याच्या पाण्याची टंचाई सुरू झाली आहे.या गावांनी टॅंकर मागणीचे प्रस्ताव तहसिल कार्यालयाकडे सादर केले आहेत. सदरील प्रस्ताव मंजुरी मिळाल्यावर सदर गावांना टॅंकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात येणार आहे.

## जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती दिशा बैठक खासदार रविंद्र वसंतराव चव्हाण.यांच्या उपस्थितीत संपन्न



**दैनिक युवक आधार.**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे**
**पपु निवळीकर**

**नांदेड** : आज नियोजन भवन ,जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे दिशा समितीचे नियोजित अध्यक्ष खासदार रविंद्र वसंतराव चव्हाण, यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पाडली यावेळी सह- अध्यक्ष खा. नागेश पाटील आष्टीकर,व खा. डॉ. शिवाजीराव काळगे, सचिव मा. राहुल कर्डीले साहेब जिल्हाधिकारी नांदेड, निमंत्रित सदस्य खा. श्री.अशोकराव चव्हाण साहेब, खा. श्री. अजित गोपछडे, आ.श्री. भीमराव केराम, आ. श्री. राजेश पवार, आ. श्री. आनंदराव तिडके, आ. श्रीजया चव्हाण, मा. मेघना कावली मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. नांदेड, मा. महेशकुमार डॉईफोड आयुक्त म. न. पा. नांदेड तसेच विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये केंद्र शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या सर्व योजना संदर्भात चर्चा करण्यात आली या मधे जलजीवन मिशन,जिवन प्राधिकरण, वीज वितरण व पुरवठा विभाग , कृषिविभाग, भूमीअभिलेख, शिक्षण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, महामार्ग, महात्मा गांधी रोजगार हमी योजना, प्रधानमंत्री आवास योजना, रेल्वे विभाग, महानगर पालिका क्षेत्रातील पाणीपुरवठा, स्वच्छता,वाहतुकीशी निगडित समस्या, पाणी टंचाई आदी विषयांवर चर्चा करण्यात आली व त्या योजनांमध्ये करवायच्या कार्यवाही बद्दल संबंधित अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या आहे

## कृषी उत्पन्न बाजार समिती पनवेल तर्फे स्वच्छ बाजार आवार अभियान



**दैनिक युवक आधार**

**पनवे वार्ताहर** : राज्याचे मुख्यमंत्री यांनी राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पुढील शंभर दिवसांचा कृती आराखडा तयार करण्याच्या सूचनेनुसार माजी आमदार दत्तूशेठ पाटील कृषी उत्पन्न बाजार समिती, पनवेल यांच्यातर्फे स्वच्छ बाजार आवार अभियान कार्यक्रम 25 एप्रिल रोजी बाजार समिती आवारात राबविण्यात आला. यावेळी येथील परिसर स्वच्छ करण्यात आला. पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये अनेक ठिकाणाहून व्यापारी, शेतकरी आपला भाजीपाला विक्रीसाठी आणत असतात. अनेक नागरिक ते खरेदी करण्यासाठी येतात. यादरम्यान भाजीपाल्याचा कचरा त्या ठिकाणी साचतो. स्वच्छ बाजार आवार अभियानाच्या अंतर्गत कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, उपसभापती, सचिव, संचालक मंडळ यांनी हातात झाडू घेऊन येथील परिसर स्वच्छ केला. यावेळी सभापती नारायणशेठ घरत, उपसभापती सुनील सोनावळे, सचिव प्रकाश नाईक, संचालक बाळकृष्ण पाटील, सुभाष पाटील, अशोक गायकर, अर्जुन गायकर, देवेंद्र मढवी, देवेंद्र पाटील, मच्छिंद्रनाथ पाटील, महादू पाटील, सखाराम पाटील, ललिता फडके, प्रताप हातमोडे, रामचंद्र पाटील, सोमनाथ म्हात्रे, दिनेश महाडिक, अतिश पाटील, यांच्यासह कृषी उत्पन्न बाजार समितीतील कर्मचारी उपस्थित होते.

## उन्हाळ्यात पाण्याचा जपून वापर करा.असे आवाहन डॉ सुनिल राऊत यांनी सामान्य नागरिकांना केले आहे.

**दैनिक युवक आधार**
**उप जिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार.**

सध्या तापमानात झपाट्याने वाढ होत असून संपूर्ण महाराष्ट्रात उन्हाळ्याची तीव्रता जाणू लागली आहे. या पार्श्वभूमीवर उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे. यवतमाळ - वाशिम लोकसभा खासदार. संजय भाऊ देशमुख यांचे कट्टर समर्थक डॉ सुनिल राऊत, वणोजा यांनी नागरिकांना पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले आहे. राऊत म्हणाले की उन्हाळ्यात जल स्तोत्रावर प्रचंड ताण येतो त्यामुळे प्रत्येक नागरिकांने जबाबदारीने वागून पाण्याचा अपव्यय टाळावा.



तसेच त्यांनी नळाच्या गळणाऱ्या तोट्याची तातडीने दुरुस्ती करण्याचे आवाहन केले आहे. घराबाहेर नळ सुरु ठेवणे, गाड्या धुण्यासाठी जास्त पाणी वापरणे किंवा बागेला अत्याधिक पाणी देणे टाळा. प्रत्येक थेंब मोलाचा आहे. असे ते म्हणाले. उन्हाळ्यातील संकट टाळायचे असेल तर पाण्याच्या थेंबा थेंबा ची किंमत समजून वापर करणे आवश्यक आहे. तसेच एखाद्याच्या बोरला किंवा विहिरीला जास्त पाणी असेल आणि आजूबाजूला एखादा पाण्यासाठी अडचणीत असेल त्यांनाही मदत करा असे सुद्धा राऊत यांनी सांगितले. पाण्यासाठी आपला एक छोटासा प्रयत्न संपूर्ण समाजासाठी मोठा आदर्श ठरू शकतो.

## खुंटेफळ येथे प्रधानमंत्री आवास योजनेच्या घरकुलाचा ऑनलाइन शुभारंभ .



> सॉफ्टवेअर हे मानवनिर्मित आहे त्यामुळे तांत्रिक अडचणीचा उपाय मानवाकडे असायलाच हवा. मात्र प्रशासनातील निर्ढावलेल्या कर्मचारी व अधिकाऱ्यांनी तांत्रिक अडचणीचे नाव सांगून गावकऱ्यांना दहा वर्षापासून हक्काच्या घरापासून दूर ठेवले. संघर्ष समितीला मुख्यमंत्र्या पर्यंत धाव घ्यावी लागली. याला जबाबदार असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कार्यवाही व्हायला हवी.
> **नवनाथ शिंदे**
> **अध्यक्ष संघर्ष समिती..खुंटेफळ ता जि लातूर**

**दैनिक युवक आधार**
**लातूर प्रतिनिधी - मोहम्मद पिंजारी**

लातूर तालुक्यातील खुंटेफळ या गावामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेच्या घरकुलाचा ऑनलाइन शुभारंभ गटविकास अधिकारी तुकाराम भालके यांच्या हस्ते नुकताच करण्यात आला. खुंटेफळ गावात गेल्या दहा वर्षापासून एकही घरकुल कोणाला मिळालेले नव्हते पण संघर्ष समिती च्या वतीने लढा देऊन खुंटेफळ ग्रामस्थांना न्याय देण्यात आला आहे . याकामी सहकार्य केल्यामुळे संघर्ष समितीच्या वतीने गटविकास अधिकारी तुकाराम भालके स्वागत करण्यात आले .व ग्रामस्थांनी त्यांचे मांडले . संघर्ष समितीचे अध्यक्ष श्री नवनाथ शिंदे सचिव विश्वनाथ शिंदे खुंटेफळचे ग्रामपंचायत अधिकारी बळीराम माळी ,माटेफळचे सरपंच विठ्ठल खोसे सामाजिक कार्यकर्ते सुफी सय्यद ,माजी सरपंच बाळासाहेब शिंदे ,उपसरपंच यशवंत शिंदे ,माजी चेअरमन हरिभाऊ शितोळे, रावसाहेब शिंदे शिवराम शिंदे ,विजयकुमार भिसे , गणेश हराळे ,शिंदे भानुदास ,भाऊसाहेब हराळे व इतर गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा धामणवणे नंबर १ शाळेच्या अमृत महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन...

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**
**चिपळूण प्रतिनिधी**

शहराच्या जवळ असलेल्या धामणवणे गावातील जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळेचा अमृत महोत्सवाचा कार्यक्रम १ मे २०२५ रोजी संपन्न होत आहे. ७५ वर्षांपूर्वी गावातील दूरदृष्टी असलेल्या सन्माननीय व्यक्तींनी शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. मुंबई व गावातील ज्येष्ठ व्यक्तींनी यासाठी मोलाचे योगदान दिले. त्यानंतर अव्याहतपणे सुरू असलेल्या या शिक्षण यज्ञात अनेकांचे सहकार्य लाभले. अशा सर्वांचे स्मरण करणे आणि ७५ वर्षाचा मागवा घेण्याच्या दृष्टीने अमृत महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी चिपळूण संगमेश्वर विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री .शेखर निकम , गुहागर विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री .भास्करशेठ जाधव, चिपळूणचे माजी आमदार श्री. रमेशभाई कदम , माजी आमदार श्री .सदानंदजी चव्हाण आणि वाशिष्ठी डेअरी मिल्क अँड मिल्क प्रॉडक्टचे अध्यक्ष सन्माननीय श्री. प्रशांतजी यादव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्याचप्रमाणे चिपळूण पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी श्रीम. उमा घारगे पाटील , तहसीलदार सन्माननीय प्रवीणजी लोकरे , गटशिक्षणाधिकारी सन्माननीय दादासाहेब इरनाक व चिपळूण नं. २ प्रभागाचे शिक्षण विस्तार अधिकारी श्री. रमाकांतजी पवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

अमृत महोत्सवाच्या एकदिवशीय कार्यक्रमांमध्ये सकाळच्या महाराष्ट्र दिनानिमित्त होणाऱ्या ध्वजवंदनानंतर ग्रंथदिंडी व संविधान दिंडीचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यानंतर सर्व मान्यवरांचा सत्कार सोहळा व मनोगताचा कार्यक्रम संपन्न होईल. दुपारच्या स्नेहभोजनानंतर सायंकाळच्या सत्रामध्ये महिलांसाठी मनोरंजनात्मक खेळ व हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्यात आलेला आहे. सायंकाळी साडेसात वाजता मान्यवरांचे व देणगीदारांचा सत्कार समारंभ संपन्न होईल. त्याचप्रमाणे रात्री माजी विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम होईल. या सर्व कार्यक्रमाला सर्व शिक्षण प्रेमींनी उपस्थित राहावे असे आवाहन अमृत महोत्सव समितीचे अध्यक्ष सन्माननीय सुभाष जाधव , शाळा समिती अध्यक्ष काशीरामशेठ शिगवण , ग्रामपंचायत सरपंच सुनील सावंत , उपसरपंच विजयालक्ष्मी वरेकर , मुख्याध्यापक शिवाजी कोदारे व सर्व समित्या सदस्य आणि ग्रामस्थ धामणवणे यांनी केले आहे. हा अमृत महोत्सव कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व ग्रामस्थ, माजी विद्यार्थी , शिक्षक आणि विशेषतः सर्व महिला मंडळे परिश्रम घेत आहेत.

# भगतसाहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त समाजोपयोगी कार्यक्रम

**दैनिक युवक धन्यवाद**
**पनवेल(प्रतिनिधी)**

कष्टकऱ्यांचे द्रष्ट नेते थोर समाजसुधारक स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३७ व्या पुण्यतिथी निमित्ताने लोकनेते रामशेठ ठाकू यांच्या मार्गदर्शनाखाली जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत पनवेल तालुकास्तरीय "स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२५" स्पर्धा तसेच "मराठी पाऊल पडते पुढे" या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांची नियोजन बैठक लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आज उलवे नोडमध्ये पार पडली. रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये झालेल्या या बैठकीस जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, श्री. रामशेठ



ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव परेश ठाकूर, खजिनदार भाऊशेठ पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, माजी पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत, वसंतशेठ पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, अमित जाधव, नेरे मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, प्रकाश भगत, संजय भगत, भार्गव ठाकूर, विजय घरत, अमोघ ठाकूर, स्वप्नील ठाकूर, जयवंत देशमुख, वामन म्हात्रे, अनंता ठाकूर, सुधीर ठाकूर, ऍड. राहुल घरत, अशोक कडू, प्रशांत कोळी, सी. एल. ठाकूर, सुहास भगत, दयानंद घरत, रवींद्र भोईर, संतोष भगत, कमलाकर देशमुख, रघुनाथ देशमुख, पंढरीनाथ ठाकूर, महादेव कोळी, किशोर पाटील, अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, गणेश जगताप यांच्यासह पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते. जनार्दन भगत साहेबांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील कार्य अफाट राहिले असून त्यांनी अहोरात्र लोकांची सेवा केली. आयुष्यापेक्षा ध्येय्य मोठे असले पाहिजे, ही शिकवण त्यांनी समाजामध्ये रुजवत फक्त राजकारण नाही तर सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. त्याचबरोबर देवदूताची भूमिका सुद्धा पार पाडत त्यांनी समाजाला न्याय दिला आहे. त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या नावाने स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार या वर्षीही देण्यात येणार आहे. त्यानुसार तालुक्यातील ग्रामपंचायतींचे स्वच्छतेच्या निकषावर सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या स्पर्धेतील प्रथम क्रमांकास १ लाख रुपये व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांकाला ५० हजार रुपये व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांकाला २५ हजार रुपये व सन्मानचिन्ह तसेच दोन उत्तेजनार्थ ग्रामपंचायतींना प्रत्येकी ११ हजार रुपये व सन्मानचिन्ह देऊन ०७ मे रोजी उलवा नोडमधील रामशेठ ठाकूर मैदान येथे होणाऱ्या पुण्यतिथी कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. तसेच 'देवकी मीडिया' प्रस्तुत व 'कलारंजना मुंबई' निर्मित, उदय साटम संकल्पित आणि दिग्दर्शित "मराठी पाऊल पडते पुढे" हा १०१ कलावंताचा संच असलेल्या कार्यक्रमाचा ४६०० वा प्रयोग सादर होणार आहे. त्या अनुषंगाने या पुण्यतिथी निमित्त आयोजित कार्यक्रमाचा नियोजन आढावा घेण्यात आला.

# तळा पोलीस ठाणेला A मानांकन दर्जा प्राप्त.

**दैनिक युवक आधार पान**
**तळा प्रतिनिधी : नितीन लोखंडे.**




**तळा** : रायगड जिल्ह्यातील तळा पोलीस स्टेशनला ए मानांकन दर्जा प्राप्त झाला असून रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांच्या प्रमुख उपस्थितीत तळा पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक श्री. सतीश गवई सर यांना स्मार्ट पोलीस ठाणे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे स्मार्ट होण्याच्या दृष्टीने जिल्हा पोलीस अधीक्षक अपर पोलीस अधीक्षक यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यामध्ये जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्याची कामकाजाची पद्धत, पेपरलेस ऑनलाइन कामकाज, कायदा व सुव्यवस्था या विषयाचे सर्वेक्षण करण्यात आले त्यामध्ये तळा तालुका पोलीस ठाणे रायगड जिल्ह्यामध्ये अव्वल ठरला आहे. तळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश गवई यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाण्याचे सर्व कर्मचारी यांच्या सहकार्याने पोलिस ठाण्याचे कामकाज चांगल्या प्रकारे करून कायदा व सुव्यवस्था उत्कृष्ट पद्धतीने हाताळत सर्व नागरिकांना समान न्याय देण्याच्या प्रामाणिकपणे प्रयत्न करत आहेत. त्यांच्या या चांगल्या कर्तुत्वामुळे तळा पोलीस ठाण्याला ए मानांकन दर्जा प्राप्त झाल्यामुळे सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश गवई सर तसेच त्यांचे सर्व सहकारी कर्मचाऱ्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## निवडक

### विधानपरिषद समित्यांचे प्रमुख नियुक्त

**मुंबई :** महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी २०२४-२०२५ या वर्षासाठी विधानमंडळाच्या विविध समित्यांवर सदस्यांची तसेच समिती प्रमुखांची नियुक्ती केली आहे. समिती पद्धतीला संसदीय लोकशाहीमध्ये अनन्यसाधारण महत्त्व असून समिती कामकाजाच्या माध्यमातून कायदेमंडळाचे कार्यकारी मंडळावरील नियंत्रणाचे कार्य सुरू असते. भारतीय राज्यघटनेतील सत्तानियंत्रण आणि सत्तासंतुलन हे तत्त्व समितीपद्धतीमुळे अधिक प्रभावीपणे अंमलात येत असते.

### पोप फ्रान्सिस यांना श्रद्धांजली

**मुंबई :** राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी कुलाबा येथील आर्चबिशप हाऊस येथे आयोजित प्रार्थना सभेत सहभागी होऊन रोमन कॅथोलिक चर्चचे प्रमुख दिवंगत पोप फ्रान्सिस यांना श्रद्धांजली अर्पण केली. राज्यपालांनी पोप फ्रान्सिस यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहिली आणि काही क्षण स्तब्ध उभे राहून त्यांना आदरांजली वाहिली. प्रार्थना सभेला मुंबईचे आर्चबिशप जॉन रॉड्रिग्स, विविध धर्मांचे प्रतिनिधी आणि मुंबईतील विविध देशांचे वाणिज्यदूत उपस्थित होते.

### महावितरणच्या संचालकपदी पवार

**मुंबई :** महावितरण कंपनीचे संचालक (मानव संसाधन) म्हणून राजेंद्र पवार यांनी शुक्रवारी कार्यभार स्वीकारला. त्यांची या पदावर थेट भरती प्रक्रियेतून निवड झाली आहे. याआधी ते पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते. महावितरणमधील सेवेचा ३६ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असणारे नवनियुक्त संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार हे मूळचे भऊर (ता. देवळा, जि. नाशिक) येथील रहिवासी आहेत. त्यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी पुणे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून (सीओईपी) विशेष प्रावीण्यासह प्राप्त केली आहे. त्यानंतर १९८९ मध्ये राजेंद्र पवार हे तत्कालीन विद्युत मंडळात कनिष्ठ अभियंता म्हणून वाशी (ता. पेण) येथे रूजू झाले.

### राजकोट किल्ल्यावरील पुतळा अंतिम टप्प्यात

**मुंबई :** महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे काम अंतिम टप्प्यात आहे, असे एका अधिकाऱ्याने शुक्रवारी सांगितले. डिसेंबर २०२३ मध्ये किल्ल्यावर बसवण्यात आलेला एक पुतळा काही महिन्यांनी गेल्या वर्षी २६ ऑगस्ट रोजी कोसळला होता, ज्यामुळे विरोधी पक्षांनी महाराष्ट्र सरकारवर तीव्र हल्ला चढवला होता. त्यांनी बांधकामातील भ्रष्टाचाराचा निषेध केला होता आणि हा प्रकार महान योद्धा राजाचा अपमान असल्याचा दावा केला होता. नवीन पुतळ्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. काम सुरू होण्यापूर्वी ऑस्ट्रेलियन कंपनीकडून पुतळ्याची वारा चाचणी घेण्यात आली. आतापर्यंत प्रकल्पावर सुमारे ३१ कोटी रुपये खर्च झाले आहेत, असे मालवण येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी अजित पाटील म्हणाले. पुतळा जमिनीपासून ९३ फूट उंच असेल, ज्यामध्ये १० फूट उंचीचा पायथा असेल आणि उर्वरित भाग पुतळा असेल. डोक्यापासून पायापर्यंतची आकृती ६० फूट असेल, तर तलवार २३ फूट असेल. पुतळा बनवणारे राम सुतार आर्ट क्रिएशन्स पुढील दहा वर्षे त्याची देखभाल देखील करेल, असे ते म्हणाले.

# शिंदे सेनेचे मंत्रीच आघाडीवर

## १०० दिवसांचा कार्यक्रम | शिवसेनेकडील खाती अग्रेसर

**मुंबई :** राज्यात महायुतीचे सरकार सत्तेत येताच महायुतीत सर्वश्रेष्ठ कोण, यात चढाओढ सुरू आहे. त्यात १०० दिवसांच्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विभाग आणि शिवसेनेचे मंत्री असलेले विभाग असे एकूण पाच विभाग अग्रेसर असल्याचे समजते. त्यामुळे महायुतीत एकनाथ शिंदे यांची शिवसेना १०० दिवसांच्या कार्यक्रमात बाजी मारणार का, हे निकालानंतर स्पष्ट होईल.

उत्कृष्ट कामगिरी, विभागात स्वच्छता, कामाची प्रगती यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्येक विभागासाठी १०० दिवसांचा कार्यक्रम आखून दिला आहे. त्यानुसार १०० दिवसांच्या कार्यक्रमाचे मूल्यमापन सुरू असून ६० विभागांची उत्तम कामगिरी असल्याचे निदर्शनास आले आहे. ६० पैकी ८ विभागांची निवड केली असून यापैकी तीन विभागांची उत्कृष्ट कामगिरी म्हणून निवड करण्यात येणार आहे. या ८ पैकी एकनाथ शिंदे यांच्या अखत्यारितील ४ विभागांची उत्तम कामगिरी असल्याचे समजते. त्यामुळे १०० दिवसांच्या कार्यक्रमात एकनाथ शिंदे यांच्या अखत्यारितील विभाग व त्यांच्या मंत्र्यांच्या अखत्यारित असलेले विभाग बाजी मारणार, अशी चर्चा असली तरी लवकरच याबाबत निकाल जाहीर होणार आहे.

**या विभागाची आगेकूच**

**शिंदेंची शिवसेना**
- सार्वजनिक बांधकाम विभाग – एकनाथ शिंदे
- परिवहन विभाग – प्रताप सरनाईक
- गृहनिर्माण विभाग – एकनाथ शिंदे
- सार्वजनिक आरोग्य विभाग – प्रकाश आबिटकर
- उद्योग विभाग – उदय सामंत

**भाजप**
- ऊर्जा विभाग – देवेंद्र फडणवीस
- ग्रामविकास विभाग – जयकुमार गोरे

**अजित पवारांची राष्ट्रवादी**
- महिला व बालविकास विभाग – आदिती तटकरे

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळताच सर्वप्रथम राज्य सरकारच्या अखत्यारितील सर्वच विभागातील कामांचा आढावा घेण्यास सुरुवात केली. प्रत्येक विभागाला १०० दिवसांचा कृती आराखडा आखून दिला आहे. १०० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत कामगिरीच्या मूल्यमापनाची ही प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे.

मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या शंभर दिवसांच्या आढाव्यात मंत्रालयातील आठ विभागांची कामगिरी अव्वल असल्याचे केंद्र सरकारच्या क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया या कंपनीकडून केलेल्या मूल्यमापनात स्पष्ट झाले. या ऑडिटमध्ये एकूण ६० विभागांपैकी सर्वात चांगली कामगिरी करणाऱ्या आठ विभागांची निवड करण्यात आली आहे. आता या आठ विभागांतून पहिले तीन विभाग निवडले जाणार आहेत. येत्या आठवडाभरात महायुती सरकारमधील सर्वात चांगली कामगिरी करणारे तीन विभाग कोणते, याचा निकाल लवकरच जाहीर होणार आहे. तर इतर विभागांना कलर कोड देऊन कामगिरी सुधारण्यासाठी वेळ दिला जाणार आहे. या विभागांची ग्रीन झोन, यलो झोन आणि रेड झोन अशी विभागणी केली जाईल. चांगली कामगिरी असणारे विभाग ग्रीन झोनमध्ये, मध्यम कामगिरी असणारे विभाग यलो झोनमध्ये आणि खराब कामगिरी असणारे विभाग रेड झोनमध्ये अशा प्रकारे ही वर्गवारी असेल, असे सांगण्यात आले.

क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडियाने चांगल्या कामगिरीमुळे निवड केलेल्या खात्यांच्या यादीत शिंदे गटाचा वरचष्मा दिसून येतो. या आठ विभागांमध्ये शिंदे गटाच्या मंत्र्यांकडे असणारे पाच विभाग, भाजपचे दोन आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या केवळ एका विभागाचा समावेश आहे. त्यामुळे आता या तिघांपैकी कोणत्या पक्षाचा विभाग अव्वल ठरणार, हे बघावे लागेल.

## टॉम आणि पिंगू




भायखळ्यातील राणीबागेतील एका पशुवैद्यकाने दीड महिन्याच्या नर आणि मादी पेंग्विनची तपासणी केली. जागतिक पेंग्विन दिनी दोघांना अनुक्रमे टॉम आणि पिंगू ही नावे मिळाली. (छाया : सलमान अन्सारी)

# कामराला हायकोर्टाचा दिलासा

**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर आक्षेपार्ह गाणे सादर केल्याबद्दल वादाच्या भोवऱ्यात सापडलेला स्टॅन्ड अप कॉमेडियन कुणाल कामराला शुक्रवारी उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला. न्या. सारंग कोतवाल आणि न्या. श्रीराम मोडक यांच्या खंडपीठाने कामराला अटकेपासून संरक्षण दिले. मुंबई पोलीस चेन्नईत जाऊन तेथील पोलिसांची मदत घेऊन कामराचा जबाब नोंदवू शकतात, असे खंडपीठाने स्पष्ट केले. कुणाल कामराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर आक्षेपार्ह गीत गायल्यामुळे वादाला तोंड फुटले. त्या गीतानंतर शिवसेना शिंदे गटाचे नेते आक्रमक झाले. आमदार मुरजी पटेल यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. त्याआधारे कुणालविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यामुळे अटकेच्या भीतीने कुणालने मद्रास उच्च न्यायालयाकडून ७ एप्रिलपर्यंत अंतरिम अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर करून घेतला होता. त्या जामिनाची मुदत संपत असल्याच्या पार्श्वभूमीवर कामरा याने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेत गुन्हा रद्द करण्यात यावा अशी विनंती करणारी याचिका दाखल केली आहे.

**अटकेपासून संरक्षण**



### चौकशीला स्थगिती देण्यास नकार

याचिकेवर शुक्रवारी न्या. सारंग कोतवाल आणि न्या. श्रीराम मोडक यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. खंडपीठाने कामराविरुद्ध सुरू असलेल्या चौकशीला स्थगिती देण्यास नकार दिला. मात्र याचिका प्रलंबित असेपर्यंत त्याला अटक करू नये, पोलिसांना आवश्यकता वाटल्यास ते चेन्नईत जाऊन कामराची चौकशी करू शकतात, असे खंडपीठाने कामराला अटकेपासून दिलासा देताना स्पष्ट केले. तसेच कामराची याचिका प्रलंबित असताना मुंबई पोलिसांनी जर त्याच्याविरोधात आरोपपत्र दाखल केले तर ट्रायल कोर्ट कामराविरुद्ध कारवाई करणार नाही, असेही खंडपीठाने आपल्या आदेशात स्पष्ट करताना कामराच्या याचिकेवरील सुनावणी तहकूब केली.

# धार्मिक स्थळी पालिकेची स्वच्छता मोहीम

## सामूहिक प्रयत्नांतून २८ एप्रिल ते ९ मे दरम्यान मुंबईत उपक्रम



> प्रामुख्याने धार्मिक स्थळाभोवतालचा परिसर, वाहनतळ, घनकचरा संकलनाचे ठिकाण, पदपथ आदींची यांत्रिक तसेच स्वच्छता कर्मचारी यांच्या सहाय्याने व्यापक स्वच्छता करण्यात येणार आहे.
>
> – **किरण दिघावकर**, उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन

**मुंबई :** मुंबई पालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून मुंबईतील धार्मिक स्थळांच्या ठिकाणी विशेष स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. मुंबईतील स्वयंसेवी संस्था, नागरिक तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी आदींच्या सामूहिक प्रयत्नांतून २८ एप्रिल ते ९ मे २०२५ दरम्यान दररोज सकाळी ११ ते दुपारी १ वाजेदरम्यान संपूर्ण मुंबईत ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) किरण दिघावकर यांच्या देखरेखीखाली मुंबईतील सार्वजनिक स्वच्छतेसाठी निरनिराळे उपक्रम राबविले जात आहेत. या अंतर्गत मुंबईत 'सखोल स्वच्छता मोहीम' राबविण्यात आली. याच पार्श्वभूमीवर आता मुंबईतील धार्मिक स्थळांच्या ठिकाणी विशेष स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे.

मुंबई पालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने संपूर्ण मुंबई महानगरात नियमितपणे स्वच्छता केली जाते. तथापि, अत्यंत सखोल आणि व्यापक पद्धतीने स्वच्छता करण्याच्या अनुषंगाने विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. २८ एप्रिल ते ९ मे २०२५ या कालावधीत दररोज सकाळी ११ ते दुपारी १ वाजेदरम्यान मुंबईतील सर्व धार्मिक स्थळांच्या ठिकाणी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येईल. संबंधित धार्मिक स्थळाशी निगडित विश्वस्त आणि अन्य प्राधिकृतांशी समन्वय साधून त्याठिकाणी स्वच्छता मोहिमेचे आयोजन केले जाणार आहे.

### पवार गट प्रवक्त्यांच्या नियुक्त्या रद्द

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी राष्ट्रवादीतील ३० हून अधिक प्रवक्त्यांच्या नियुक्त्या रद्द केल्या आहेत. नवीन नियुक्त्या लवकरच करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. पक्षाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत वरिष्ठ नेत्यांना केलेल्या विरोधामुळे महेश तपासे यांची मुख्य प्रवक्ते पदावरून उचलबांगडी करण्यात आली.

## शांततेचे आवाहन




पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्यासाठी मुंबईतील मीनारा मशिदीबाहेर रझा अकादमीच्या सदस्यांनी शुक्रवारी निदर्शने केली. (छायाचित्र – सलमान अन्सारी)

# आदिलच्या कुटुंबीयांना ५ लाख

## उपमुख्यमंत्री शिंदे सय्यदच्या कुटुंबीयांना घर बांधून देणार

**मुंबई :** पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात पर्यटकांच्या मदतीसाठी धाव घेणारा जम्मू-काश्मीरमधील २० वर्षीय सय्यद आदिल हुसैन शाह याचा मृत्यू झाला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वैयक्तिकरीत्या सय्यदच्या कुटुंबीयांना पाच लाख रुपयांची मदत करत मोडकळीस आलेले घर बांधून दिले जाणार आहे. पहलगाम येथे मदतीसाठी गेलेले शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्ते व सरहद संस्थेचे पदाधिकारी यांच्या माध्यमातून शुक्रवारी सय्यदच्या कुटुंबीयांना धनादेश देण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सय्यदच्या कुटुंबीयांशी संवाद साधून त्यांना धीर दिला.

सय्यद आदिलच्या कुटुंबीयांची शिवसेना कार्यकर्ते आणि सरहदचे पदाधिकारी यांनी भेट घेत मदतीचा धनादेश त्यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी स्थानिक आमदार सईद रफीक शाह उपस्थित होते. व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सय्यदच्या कुटुंबीयांशी संवाद साधला. सय्यद आदिलच्या भावाने हल्ल्याच्या दिवशी झालेला घटनाक्रम सांगितला. त्याने पर्यटकांच्या बचावासाठी कशा प्रकारे दहशतवाद्यांशी मुकाबला केला. रायफल खेचली आणि दहशतवाद्यांनी त्याला कशा गोळ्या घातल्या हा अनुभव त्याने सांगितला.

### भूमिअभिलेख उप अधीक्षक निलंबित

**मुंबई :** पुणे हवेली येथील भूमिअभिलेख उप अधीक्षक अमरसिंह रामचंद्र पाटील यांच्याविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक अंतर्गत येरवडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमरसिंह पाटील यांचे निलंबन करण्यात आले आहे.

अमरसिंह पाटील यांच्याविरुद्ध कलम ७ (भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम) तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३०८ (२), १९८ व २०१ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्याविरोधातील तक्रारीच्या पार्श्वभूमीवर कामकाजाची सखोल चौकशी करण्यासाठी भूमिअभिलेख विभागाने विशेष समिती स्थापन केली आहे.

प्रकरणाचा विचार करता महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ अंतर्गत, पाटील यांना तत्काळ निलंबित करण्यात आले आहे. पुढील आदेश येईपर्यंत ते शासन सेवेतून निलंबित असणार आहेत. निलंबन कालावधीत त्यांचे मुख्यालय उप अधीक्षक, भूमिअभिलेख कार्यालय, लोहारा, जि. धाराशिव येथे निश्चित करण्यात आले असून त्यांनी जिल्हा अधीक्षक, भूमिअभिलेख, धाराशिव यांची परवानगी घेतल्याशिवाय मुख्यालय सोडता कामा नये, असा आदेश आहे.

# पालिका रुग्णालयांकडून मानसिक आरोग्य सेवा

## पहलगाम दुर्घटनेतील जखमींसाठी सुविधा

**मुंबई :** पहलगाम येथे नुकत्याच झालेल्या दुर्घटनेनंतर जखमी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी मुंबई महानगरपालिकेच्या टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेज आणि बीवायएल नायर हॉस्पिटल, गोरधनदास सुंदरदास मेडिकल कॉलेज आणि केईएम हॉस्पिटल, लोकमान्य टिळक म्युनिसिपल मेडिकल कॉलेज आणि लोकमान्य टिळक म्युनिसिपल जनरल हॉस्पिटल तसेच हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मेडिकल कॉलेज आणि आर. एन. कूपर हॉस्पिटलमध्ये मानसिक आरोग्य सेवा विविध पातळ्यांवर उपलब्ध करून दिल्या आहेत.

मुंबईतील या चार प्रमुख महापालिका रुग्णालयांमध्ये सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत समुपदेशन, तीव्र तणावाचे मूल्यमापन, पीटीएसडी (पोस्ट ट्रॉमॅटिक स्ट्रेस डिसऑर्डर) ची शक्यता, औषधोपचार आणि आवश्यकतेनुसार रुग्णालयात भरती यासह सेवा दिल्या जाणार आहेत. तसेच याच रुग्णालयांमध्ये रात्री ४ ते सकाळी ९ या वेळेत तणाव, निद्रानाश, अस्वस्थता, घटना पुन्हा अनुभवण्याची भावना यासाठी आपत्कालीन समुपदेशन व औषधोपचाराची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. हितगुज (HITGUJ) या आत्महत्येच्या प्रतिबंधासाठीच्या ०२२-२४१३१२१२ या दूरध्वनी हेल्पलाइनचा वापर करून सकाळी ९ ते दुपारी ४ पर्यंत तज्ज्ञ समुपदेशक मानसिक लक्षणांची तपासणी करतील व आवश्यकतेनुसार रुग्णालयात पाठवण्यात येईल.

## केंद्राच्या योजनांच्या निधीसाठी डिजिटल क्रांती

# राज्यात सायबर कोषागार स्थापन करण्याचा निर्णय

**मुंबई :** महाराष्ट्र सरकारने केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी जलद, पारदर्शक आणि डिजिटल पद्धतीने वितरीत करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या १ जुलै २०२५ पासून हे मुंबईत कार्यरत होईल. एसएनए- स्पर्श या कार्यपद्धतीद्वारे निधी वितरणास गती मिळण्यासह योजनांच्या अंमलबजावणीत कार्यक्षमता आणि पारदर्शकता वाढेल, असा दावा सरकारने केला आहे.

भारत सरकारने सात राज्यांत एसएनए-स्पर्शचा यशस्वी प्रायोगिक वापर केला आहे. आता महाराष्ट्रासह २० राज्यांत २७ योजनांसाठी ही पद्धत लागू होईल. यामुळे निधी गैरव्यवहार कमी होईल, योजनांची अंमलबजावणी गतिमान होईल आणि अनुसूचित जाती, जमाती लाभार्थ्यांना विशेष अनुदानाचा त्वरित लाभ मिळेल. महाराष्ट्रातील ग्रामीण आणि शहरी विकासाला यामुळे चालना मिळणार आहे. संचालक, लेखा व कोषागारे यांना कार्यपद्धती, मनुष्यबळ आणि सॉफ्टवेअर विकासाची जबाबदारी आहे. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे एसएनए-स्पर्श विकसित करेल. प्रत्येक योजनेसाठी आहरण खाते भारतीय रिझर्व्ह बँकेत उघडणे आवश्यक असणार आहे.

एसएनए-स्पर्श ही भारत सरकारची नावीन्यपूर्ण कार्यपद्धती आहे. सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली, राज्य एकीकृत वित्तीय व्यवस्थापन प्रणाली आणि भारतीय रिझर्व्ह बँकेची ई -कुबेर प्रणाली यांचे एकत्रीकरण यामुळे करता येणार आहे. एकल मध्यवर्ती अभिकरणे आणि अंमलबजावणी यंत्रणा यांच्या ई-मागण्या महाराष्ट्र एकल मध्यवर्ती अभिकरण प्रणालीद्वारे एकत्रित होऊन ई-बिल्स तयार होतील. सायबर कोषागार ही बिले तपासून ई-कुबेर मार्फत थेट लाभार्थ्यांना निधी हस्तांतरित करता येईल. महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार हे केंद्र पुरस्कृत योजनांसाठी स्वतंत्र डिजिटल कार्यालय महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील उपसंचालक दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली काम करेल. यामुळे निधी वितरणाची प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन आणि पेपरलेस होण्यास मदत होणार आहे. या निर्णयामुळे निधी जलद, पारदर्शक आणि डिजिटल पद्धतीने वितरीत होण्यास मदत होणार आहे.

### लेखांकन करणे होणार सोपे

डिजिटल कार्यप्रणालीमुळे सर्व व्यवहार महाकोष आणि एसएनए-स्पर्श प्रणालीद्वारे डिजिटल स्वरूपात होतील. ई-हस्ताक्षर सुविधेमुळे दस्तावेज प्रमाणित होतील. योजनांचा निधी वेळेवर लाभार्थ्यांपर्यंत पोहोचेल, ज्यामुळे रखडलेली कामे गतिमान होतील. डिजिटल स्वरूपात प्रधान महालेखापाल यांना सादर करण्यात येईल. एकापेक्षा जास्त बिल कार्यपद्धतीमुळे केंद्र हिस्सा, राज्य हिस्सा आणि वाढीव अनुदान एकाच बिलात समाविष्ट करता येणार आहे. ज्यामुळे लेखांकन करणे सोपे होईल.



www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक
# युवक आधार
मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

दै. युवक आधार करीता
प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर







